# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
### ५३९, कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/4491
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक- ०६/०३/२०२३

प्रति,
प्राचार्य,
माहिती तंत्रज्ञान ऑनलाईन परीक्षा घेणारी
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२३ "माहिती तंत्रज्ञान" (I.T.) व "सामान्यज्ञान" (G.K.) या विषयाचे गोपनीय साहित्य घेणेसाठी I.T. शिक्षक पाठविणेबाबत.**

संदर्भ - पत्र क्र.रा.मं/ऑनलाईन/आय.टी./जी.के./६९०६/ दिनांक २१ डिसेंबर २०२२.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२३ च्या "माहिती तंत्रज्ञान"(I.T.) व "सामान्यज्ञान"(G.K.) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षा या आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये होत आहेत. माहिती तंत्रज्ञान विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २३ मार्च २०२३ ते २५ मार्च २०२३ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १:३० आणि दुपारी ३:०० ते ५:३० तसेच सामान्यज्ञान विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २४, २५ व २७ मार्च २०२३ रोजी सकाळी ११:०० दुपारी १:०० व दुपारी ३:०० ते ५:०० या प्रमाणे एकूण २ सत्रामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

सदरच्या परीक्षेचे साहित्य आपणांस **सातारा, सांगली जिल्हा दिनांक १३/०३/२०२३ रोजी व कोल्हापूर जिल्हा दिनांक १४/०३/२०२३ रोजी** याप्रमाणे देण्यात येणार आहे. सदर दिवशी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० या वेळेत साहित्य वितरण करण्यात येणार आहे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा माहिती तंत्रज्ञान (I.T) विषय शिक्षकच मंडळ कार्यालयात सकाळी १०:०० वाजता साहित्य स्विकारणेसाठी अधिकार पत्र घेवून पाठवून देणेत यावे. सदर दिलेल्या वेळेतच उपस्थित रहावे.

**सदर परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य परीक्षा झाल्यानंतर सातारा, सांगली जिल्हा दिनांक २९/०३/२०२३ रोजी व कोल्हापूर जिल्हा दिनांक ३१/०३/२०२३ रोजी याप्रमाणे कार्यालयात जमा करावयाचे आहे याची नोंद घ्यावी.**

(डी.एस.पोवर)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.